# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/01/2024 (शनिवार) सायंकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर पंजाब नॅशनल बॅक जे एन रोड आंबेडकर चौक जवळ कन्हान येथे दिनांक ०४/०१/२०२४ चे १९.०० वा. पासुन ते दिनांक ०५/०१/२०२४ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– लक्ष्मण गणपत पराते, वय ५४ वर्ष, रा. १०१ स्वस्तीक अपार्टमेंट हुडकेश्वर नाका बस स्टॉप नागपूर हे पंजाब नॅशनल बॅकेत सीनीयर मॅनेजर असुन डयुटी करीता गेले असता बॅकचा चपराशी याने सांगितले की, काहीतरी बॅकेमध्ये गडबड झाली त्यावरून फिर्यादी व स्टाफ मिळुन बॅकेमध्ये प्रवेश करून पाहणी केली असता बॅके मधील फाईल वगैरे अस्ताव्यस्त पडुन होत्या व बॅकेतील चोरी झाल्याचे समजले लाकडाची खिडकी तोडुन दिसली यावरून बॅकेत कोणीतरी अज्ञात चोराने बॅकेच्या आत प्रवेश करून एकुण ०९ ups ची बॅटरी प्रत्येकी किंमती ७२४८/– प्रमाणे एकुण ६५२३२/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस निरीक्षक सार्थक नेहते पोस्टे कन्हान यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतिश फुटाणे मो. नं. ९५१८३३४७२३ हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत मौजा कोदामेंढी शिवार येथे दिनांक ३०/१२/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक ३१/१२/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगराज इस्तारू पटले, वय ५३ वर्षे, रा. वाघबोडी, ता. मौदा, जि. नागपुर हे धनराज तितीरमारे यांची कोदामेंढी शिवारातील चार एकर शेती ठेक्याने करीत असुन त्यांच्या शेतीला लागुनच शिवचरण तितीरमारे यांची शेती भास्करराव सत्यम गुत्तल, रा. वाघबोडी हे ठेक्याने करीत आहे. फिर्यादीने दिनांक ३०/१२/२०२३ रोजी ठेक्याचे शेतातील कापुस वेचण्याकरीता बाहेर गावावरून मजुर लावुन दिवसभर शेतातील कापुस वेचला रात्र झाल्याने कापुस नेण्याकरीता साधन नसल्याने शेतातील वेचलेला कापुस धुऱ्यावर ठेवुन फिर्यादी व त्यांची पत्नी घरी निघुन गेले. दि. ३१/१२/२०२३ रोजी सकाळी ०७/०० वा. दरम्यान फिर्यादी हे शेतात आले असता त्यांना शेतात वेचलेला कापुस दिसला नाही. शेताच्या बाजुला असलेल्या भास्करराव सत्यम गुत्तल रा. वाघबोडी यांना विचारपुस केले असता त्यांनी सांगितले की, दि. ३०/१२/२०२३ रोजी शेतात वेचनी केलेला कापुस धुऱ्यावर ठेवलेला कापुस दिसत नाही. तेव्हा पासुन फिर्यादीनी आजपर्यंत आजुबाजुला तसेच शेजारी शेतकऱ्यांना व शेतात काम करणारे मजुरांना विचारपुस केली असता कोणीही कापुस नेले नसल्याचे सांगितले. कोणीतरी अज़्ञात चोराने फिर्यादी व भास्करराव गुत्तल यांचे ठेक्याचे शेतातील वेचुन ठेवलेला एकुण कापसाचे ३१ बोरे अंदाजे ०५ क्विंटल कापुस किंमती २४,०००/– रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार संदीप बाजनघाटे यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदीप बाजनघाटे मो. नं. ९५६१०३४२८७हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**